# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २३९–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. विठोबा मोगलप्पा पोगुल ,<br>३४२, साखर पेठ, सोलापूर | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, सोलापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर विभाग, सोलापूर<br>३) उप कार्यकारी अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर ड उप विभागीय कार्यालय, सोलापूर | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्राहक तक्रार निवारण मंच खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. विठोबा मोगलप्पा पोगुल, ३४२, साखर पेठ, सोलापूर यांनी नवीन वीज जोडणीसाठी ‘अ‘ नमुन्यात दि. ३.५.२०१० रोजी अर्ज दाखल केला आहे. तथापि, सदर जागेवर जुनी वीज बिलाची थकबाकी असलेने थकबाकी भरल्याशिवाय नव्याने जोडणी देता येणार नाही असे वितरण कंपनीने कळविल्यामुळे गाऱ्हाणे उत्पन्न झाले आहे. सबब अर्जदार यांनी विनियमातील तरतुदीनुसार दि. ३.७.२०१० रोजी तक्रार क्र. १६/२०१० ने ‘ क्ष ‘ नमुन्यात अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्याचा निर्णय / आदेश क्र. ५८८१ दि. २६.८.२०१० ने दिला आहे.

सदरचा आदेश मान्य न झालेने ग्राहकाने ' अ ' नमुन्यामध्ये ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांचेकडे दि. ५.१०.२०१० रोजी पोष्टाने अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंचाने दाखल करुन वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व दि. ९.११.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणी निश्चित केली व तसे उभयतांना कळविले. त्याप्रमाणे सुनावणीच्यावेळी कार्यकारी अभियंता, श्री. कोलप व उप कार्यकारी अभियंता ए.एस. बिळ्ळे तसेच ग्राहक श्री. पोगुल व प्रतिनिधी म्हणून श्री. एम.एस. फंड उपस्थित होते. ग्राहक प्रतिनिधीने आपले म्हणणे व कागद सादर केले. तथापि, वि.प.ने अधिक कागद हजर करण्यासाठी मुदत मागून घेतली, मंचाने तशी मुदत दिली. वि.प.ने व ग्राहकाने दिलेल्या मुदतीत कागद हजर केले.

सुनावणीच्या दरम्यानची कथने व म्हणणे, तक्रारी सोबतची दाखल कागदपत्रें व त्यानंतर परत नव्याने दाखल केलेली कागदपत्रे या आधारे ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप व मागणी तसेच वि.प.ची त्या मागील भूमिका व कार्यवाही याचा सर्वसाधारणपणे तपशील खालील प्रमाणे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांनी दिलेला आदेशही विचारांत घेतला आहे.

<u>ग्राहकाच्या मागणीचे सर्वसाधारण स्वरुप</u>

श्री. पोगुल यांनी दाखल केलेली कागदपत्रें तसेच प्रतिनिधी श्री. फंड यांची सुनावणी दरम्यानची कथने विचारांत घेता, मागणी केलेल्या वीज जोडणीच्या ठिकाणची थकबाकी, वि.प.च्या म्हणण्यानुसार भरुनही इतर गट क्रमांकामधील थकबाकी भरण्याचा आग्रह व मागणी चुकीची आहे. मी ज्या जागेत वीज जोडणी नव्याने मागितली आहे त्या जागेचे स्वतंत्र ७/१२ पत्रक निघत असल्याने त्याचप्रमाणे त्या ठिकाणी पूर्वी असलेल्या युनिटची वि.प.ने कळविल्याप्रमाणे सर्व थकबाकी रक्कम रु. १,०७,९०५/– दि. ३०.४.२०१० रोजी भरलेले आहेत. त्यामुळे संबंधित जागेत कोणत्याही प्रकारची बिलासंबंधीची बाकी नाही. असे असतांना इतर गट नंबरची बाकी चुकीच्या पध्दतीने वसूल करण्याचा वि.प.च इरादा कायदेशीर नाही. त्यामुळे विनाकारण वीज जोडणी संदर्भात चलन देण्यास व पुढे जावून वीज देण्यास नाहक अडवणूक केली जात आहे. त्यामुळे विनियमातील तरतुदीचा विचार घेवून मजला वीज जोडणी मंजूर व्हावी, तसेच विलंबाबद्दल शास्ती वसूल होवून मिळावी अशी मागणी नोंदविली आहे.

<u>वि.प.ची भूमिका व कार्यवाही</u>

श्री. विठोबा मोगलप्पा पोगुल यांनी गट क्र. १५२/५ मध्ये वीज मागणी केली आहे ही गोष्ट खरी आहे. तसेच सदर जागेतील थकबाकी भरली आहे ही गोष्ट सत्य आहे. तथापि, एक जुना गट क्र. १५४, नवीन १५२ चे १ ते ८ असे हिस्से झाले असल्यामुळे व सदर हिश्यामधील संबंधित श्री. पोगुल हे वारसदार असल्याने श्री. एस.एम. पोगुल, ग्राहक क्र. ३३०२४९००२०६२ वरील रु. ३,७१,०००/– व पोगुल स्पिनींग मिल ग्राहक क्र. ३३०२४९००२४९६ वरील रु. ७६,५८,०१८/– हीही बाकी भरणे आवश्यक आहे. सदरची बाकी भरण्याची जबाबदारी श्री. पोगुल यांची असल्याने त्यांना कळवूनही तसेच कक्षानेही तसाच निर्णय देवूनही श्री. पोगुल चुकीची मागणी करुन आपली जबाबदारी टाळत आहेत. त्यामुळे मंचाने सर्व थकबाकी भरण्याबाबतचे आदेश द्यावेत व सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी वि.प.ची भूमिका दिसून येते.

ग्राहकाची मागणी व वि.प.ची भूमिका याचा सर्वसाधारणपणे वर उल्लेख केला आहे. यावरुन मंचास निष्कर्षासाठी पुढील मुद्दे उपस्थित होतात.

मुद्दा क्र. १ वि.प.च्या म्हणण्यानुसार इतर गट नंबरवरील थकबाकी संदर्भात आता मागणी नोंदविणे व त्यासाठी जोडणी न देणे योग्य आहे काय ?

उत्तर : नाही

मुद्दा क्र. २ मागणी केलेल्या १५२/५ मध्ये किती थकबाकी होती व ती नवीन अर्जदार यांनी भरली आहे काय ?

उत्तर : होय. गट क्र. १५२/५ मध्ये रु. १,०७,९०५ इतकी बाकी होती व ग्राहकाने ती भरली असल्याने वीज जोडणी देणे योग्य आहे.

मुद्दा क्र. ३ आदेश ?

उत्तर : अंतिम आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

सर्व्हे नं. १५४ हा जुना गट क्रमांक असून त्याचा नवीन सर्व्हे क्रमांक १५२ असा दि. २९.१०.१९८७ रोजी झालेला आहे. त्यामध्ये गट क्र. १५२ १ ते ८ असे वेगवेगळे हिस्से महाराष्ट्र शासनाच्या महसुली पत्रकात म्हणजे ७/१२ वर नोंदविलेले आहेत. वि.प.ने जुना गट क्र. १५४ याचे जे नवीन हिस्से झाले त्याचा विचार न करता पूर्वीच्या गट क्र. १५४ मध्ये असलेल्या श्री. एस.एम. पोगुल, मे. समर्थ प्रोसेसिंग हाऊस, पोगुल स्पिनींग इत्यादी युनिटस्ची थकबाकी वसूल होणे संदर्भात श्री. पोगुल यांची वीज जोडणी थांबविलेली आहे. सदरची कनेक्शन्स सन १९९४, १९९९ व १९९३ रोजी कायमस्वरुपी बंद केलेली आहेत. वि.प.ने दाखल केलेली कागदपत्रें, ७/१२ उतारे, फेरफार उतारे, हक्कपत्र ६ इत्यादी कागदपत्रे तपासणी केल्यावर ज्या हिश्याकडे म्हणजे गट क्र. १५२/५ मध्ये वीज जोडणी मागितली आहे तेथील ७/१२ उतारा व त्यावरील फेरफारच्या नोंदी या सर्वांचा परामर्श घेता, त्यामध्ये मे. समर्थ प्रोसेसिंग हाऊस या संस्थेस जोडणी दिलेली आहे. थकबाकीसाठी दि. ३०.९.१९९९ रोजी सदरचे युनिट कायमस्वरुपी बंद केल्याचे वि.प.ने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तसेच सदर जुन्या गट क्रमांकाच्या पोट हिश्याप्रमाणे श्री. शंकरराव कटकम व त्यांचे टेक्स्टाईल ३ युनिट, पोलीस स्टेशन यांना कोणत्याही प्रकारची थकबाकी भरण्याचा आग्रह न करता वीज जोडणी दिलेल्या आहेत. तसेच ग्राहकाने दि. २६.४.२०१० रोजी अर्ज करुन संदर्भिय नंबरामध्ये किती थकबाकी आहे याची विचारणा अधीक्षक अभियंता, सोलापूर यांना केल्याचे दिसून येते. अधीक्षक अभियंता सोलापूर यांनी पत्र क्र. ३०३३ दि. ३०.४.२०१० नुसार रु. १,०१,६६७.१० थकबाकी व त्यावरील व्याज व कायदेशीर खर्चासाठी रु. ६२६८/– अशी एकूण रु. १,७७,९०५/– थकबाकी असल्याचे कळविलेले आहे. त्यास अनुसरुन श्री. पोगुल यांनी पावती क्र. ७१७५७२५ व ७२६ दि. ३०.४.२०१० ने सदरची थकबाकी रक्कम भरलेली दिसून येते. त्यामुळे सदर गट क्र. १५२/५ मध्ये कोणतीही थकबाकी नसल्याने बाकीच्या नंबरवर थकबाकी आहे ही वस्तुस्थिती असतांनाही वेगवेगळ्या क्रमांकाने महसुलाच्या ७/१२ पत्रकी मालकी हक्क प्रस्थापित झाले आहेत व त्यामुळे इतर ठिकाणची थकबाकी मागणे योग्य नसल्याने मुद्दा क्र. १ चे उत्तर नाही असे नोंदविले आहे व संबंधित मागणीच्या ठिकाणची गट क्र. १५२/५ मधील थकबाकी पूर्वी भरली असल्याने विनियमातील १०.५ च्या तरतुदीनुसार पूर्ण रक्कम भरली असल्याने सदरच्या जागेवर जोडणी देणे योग्य आहे असे मंचाचे मत आहे. उर्वरित जागेवरील थकबाकीसाठी वि.प. न्याय मार्गाने ती वसूल करु शकते. त्यासाठी श्री. पोगुल यांचा अर्ज तटविणे अयोग्य आहे. जुना गट क्र. १५४ त्याचा नवीन गट क्र. १५२ १ ते ८ व त्या अंतर्गत परत झालेले पोट हिस्से तसेच मूळ मालमत्ता, श्री. मोगलप्पा बळीराम पोगुल यांची असल्याने वि.प.चे सकृतदर्शनी वसुली संदर्भातील धोरण योग्य वाटते. तसेच सहाय्यक विधी सल्लागार व नोडल ऑफीसर यांनी सर्व कागदपत्रे पाहून थकबाकीची वसुली व्हावी या दृष्टीने भूमिका घेतली असल्यामुळे अर्जाचा निर्णय करण्यास व जोडणी संदर्भात पुढील कार्यवाही करणेसाठी विलंब झाला आहे त्यासाठी विनियमातील तरतुदीनुसार शास्ती देणेही योग्य आहे.

तथापि वि.प.च्या थकबाकी वसुली संदर्भातील भूमिका लक्षांत घेता, ग्राहकाने जरी मागणी केली असेल तरी झालेला विलंब हा दूर्लक्षित करुन मंच शास्तीची मागणी नाकारत आहे. त्याचप्रमाणे वि.प.ने आदेश प्राप्त होताच ग्राहकाच्या मागणीनुसार सत्वर ग्राहकास करावयाच्या खर्चासंबंधीचे चलन द्यावे व कागदपत्रांची पूर्तता तसेच चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावर विनियमातील तरतुदीनुसार ३ महिन्यांच्या आंत जोडणी द्यावी असा मंच आदेश देत आहे.

## आदेश

१) विनियमातील १०.५ तरतुदीनुसार वि.प.ने कळविल्याप्रमाणे ग्राहकाने थकबाकी भरलेली आहे, त्यामुळे ग्राहकाचा नवीन वीज जोडणीचा अर्ज मंजूर करावा.

२) संबंधित अर्जदार श्री. पोगुल यांना खर्च करावयासंबंधीचे चलन तात्काळ देण्यात यावे.

३) संबंधित कागदपत्रें व चाचणी अहवाल प्राप्त झालेनंतर ३ महिन्याचे आंत विनियमातील तरतुदीनुसार जोडणी द्यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई- ५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : (जी. सी. लेले)
सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.